भारतीय जनता पार्टी-महाराष्ट्र
सी.डी.ओ. बॅरॅक १, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०
दूरध्वनी : २२०२ २० ५० फॅक्स : २२८५ २३ ०५

कृपया प्रसिध्दीसाठी

मुंबई : बुधवार दि. २८ नोव्हेंबर, २००७

## गहू घोटाळा याचिका

## राज्य व केंद्र सरकारला जबाब देण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश

- डॉ.किरीट सोमैया

राज्य सरकार, केंद्र सरकार, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व अन्य प्रतिवादींनी दोन आठवड्यात आपले लेखी जबाब दाखल करण्याचे निर्देश आज मुंबई उच्च न्यायालयाने दिले. गहू आयात घोटाळा प्रकरणात भाजपा नेते, माजी खासदार डॉ.किरीट सोमैया यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणी प्रसंगी आज न्यायमुर्ती जे.एन. पटेल आणि न्यायमुर्ती श्रीमती निशिधा म्हात्रे यांनी हे निर्देश दिले.

डॉ.सोमैया यांच्यावतीने ज्येष्ठ वकील ॲड.राजीव कुमार यांनी सडलेल्या लाल गव्हाच्या वितरणाचा मुद्दा काढला असतांना राज्य सरकारने हे वितरण थांबविले असल्याचे, राज्य सरकारच्या वकिलांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी न्या.पटेल यांनी या गव्हाचे सरकार आता काय करणार आहे? या गव्हाची विल्हेवाट कशी लावण्यात येणार, असा प्रश्न विचारला. संपूर्ण देशात अशा गव्हाचे वितरण झाले आहे का? असा प्रश्नही न्या.जे.एन. पटेल यांनी यावेळी विचारला.

मु.कि. कुळकर्णी

(मुकुंद कुळकर्णी)
कार्यालय सचिव